# 4 जानेवारी

**आजचा सुविचार :**

**“आपल्याला कोणी फसवले ह्याचे दु:ख फार काळ राहत नाही पण आपण कोणाला फसवलं नाही याचा आंनद मात्र लांब काळापर्यंत राहतो.”**

**आजचे पंचांग :**

| | |
|---|---|
| **वार – मंगळवार** | **दिनांक : 4 जानेवारी 2022** |
| **तिथी – पौष** | **नक्षत्र – उत्तराषाढा** |
| **सुर्योदय – सकाळी 7.00 वाजता** | **सूर्यास्त – सायंकाळी 6. 14 वाजता** |

**आजचे दिनविशेष :**

**जागतिक ब्रेल दिन**
**1958: स्पुटनिक-1 हा पहिला मानवनिर्मित उपग्रह पृथ्वीवर परत उतरला.**
**1959: रशियाचे लुना-1 हे अंतराळयान चंद्राजवळ पोहोचले.**

**1962: न्यूयॉर्क अमेरिका येथे पहिली चालकरहित रेल्वे सुरु झाली.**

**आजचे इंग्लिश शब्द :**

**1) Area – क्षेत्र    2) Before - आधी    3) Carry – वाहून नेणे    4) Criminal – अपराधी**

**आजची प्रश्नमंजुषा :**

**1) भारताचे राष्ट्रपिता असे कोणाला म्हणतात?**

**2) आपल्याला जवळचा समुद्र कोणता?**

**3) जन गण मन कोणी लिहिले आहे?**

**4) भारताच्या शेजारी देश कोणते?**

**बोधकथा :**

## गर्विष्ठ मेणबत्ती

एकदा एका गृहस्थाने मेजवानीसाठी मित्रांना बोलावले होते. सगळेजण दिवाणखान्यात एका मोठ्या मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते,ते पाहून मेनबत्तीला स्वत:चा अभिमान वाटला,आपल्या प्रकाशाचा केवढा उपयोग आहे हे पाहून ती गर्वाने म्हणाली “ज्या वेळी व ज्या ठिकाणी सूर्य चंद्राचा प्रकाश पोहोचू शकत नाही. त्या वेळी व त्या स्थळी माझा प्रकाश पडू शकतो. चंद्र सूर्य ही माझ्यापुढे क्षुद्र वाटतात.” तिचे हे गर्वाचे बोलणे ऐकून जेवणारी मंडळी हसली. त्यातला एकजण उठला व त्याने खिडकी उघडली. त्याबरोबर हवेची झुळूक आली व मेणबत्ती विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद केली व मेणबत्ती पेटवली. मग तो गृहस्थ मेनबत्तीला म्हणाला “अगं वेडे तरी प्रकाश दे, एवढ्याश्या झुळकेने विझतेस, चंद्र सूर्याला क्षुद्र समजतेस त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची मिजास करतेस. चंद्र सूर्य कधी तुझ्यासारखे वाऱ्याच्या झुळुकेने विझून गेले आहेत का?”

तात्पर्य – आपल्यावर सोपवलेली कामगिरी व्यवस्थित पार पाडण्यातच मोठेपण आहे.